# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 25/06/2020 (गुरूवार)
(सायंकाळ)

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 8 किमी अंतरावर मौजा खुबाळा शिवार नाला येथे दिनांक 24/06/2020 चे 09.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अनिल महादेव मोरे(तहसील कार्यालय मंडळ अधिकारी), वय 48 वर्ष, रा. सावनेर हे त्यांच्या सहकार्यासह रेती वाहतुकीचा आळा घालण्याकरीता रेती वाहतुकीचे गाडीवर कार्यवाही करीत असता विना क्रमांकाचा टैक्टर व ट्रॉलीचा मालक आरोपी नामे क्र. 1) उमेश गजानन रोकडे, वय 30 वर्ष, रा. खापा व 2) चालक आरोपी नामे– सुरेन्द्र लक्ष्मण आहार, वय 32 वर्ष, रा. खुबाळा यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 3,000/–रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 5,03,000/–रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला. मोक्यावरील विनानंबरचे ट्रॅक्टर व ट्रॉली रेती भरलेले सरकारी आदेशाचे अवहेलना करून मोक्यावरून आरोपी क्र. 1 व 2 यांनी पळ काढला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 188, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गंगाधर ठाकरे 9923908382 हे करीत आहे.

### विनयभंग

1) पो.स्टे. खापरखेडा :– दि. 16/06/2020 चे 13:30 वा. चे सुमारास फिर्यादी यांची 16 वर्षीय पिडीत हिचा पाठलाग आरोपी नामे– सागर राजेश हट्टेल, वय 21 वर्ष, रा. न्यु खलासी लाईन हा सन 2018 पासुन करीत होता. तसेच आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व बदनामी करण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354 (ड), 506 भादंवि. सहकलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि धुमाल 9970848688 या करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 17/06/2020 चे 12:00 वा. ते दि. 23/06/2020 चे 10:10 वा. चे सुमारास 21 वर्षीय पिडीत/फिर्यादी हिच्या परीचयाचा आरोपी नामे– शुभम भारती, रा. हिंगणा जि. नागपूर हा तिचा पाठलाग करून तिच्या इच्छा नसतांना तिच्यावर प्रेम व्यक्त करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354 (ड) भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ सपाटे 9823998476 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर